**मे. विमला इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा. लि., कार्यालय-एफ-४, पहिला माळा, श्रद्धा हाऊस, किंग्स वे, एस.बी.आय. हेडक्वॉर्टर जवळ, नागपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित मे. विमला इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा. लि. स. नं. ५०, ताडाली, ता. जि. चंद्रपूर येथे ७.५ हे. क्षेत्रात १.५ दशलक्ष टन प्रति वर्ष उत्पादन क्षमतेच्या कोल वॉशरी प्रकल्पाबाबतच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **१५/०२/२०२०** |
| **वेळ** | : | **सकाळी ११.०० वाजता** |
| **स्थळ** | : | **प्रकल्प स्थळ, स. नं. ५०, ताडाली, ता. जि. चंद्रपूर** |

**<u>प्रस्तावनाः-</u>**

मे. विमला इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा. लि., कार्यालय-एफ-४, पहिला माळा, श्रद्धा हाऊस, किंग्स वे, एस.बी.आय. हेडक्वॉर्टर जवळ, नागपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित मे. विमला इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा. लि. स. नं. ५०, ताडाली, ता. जि. चंद्रपूर येथे ७.५ हे. क्षेत्रात १.५ दशलक्ष टन प्रति वर्ष उत्पादन क्षमतेच्या कोल वॉशरी प्रकल्पाबाबतच्या प्रकल्पधारकाने पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अर्ज सादर केल्यानंतर पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (EAC) यांनी त्यांच्या दि. २८/०४/२०१९ रोजी सदर प्रस्तावीत प्रकल्पास प्राथमिक पत्र (TOR) जारी केले (सहपत्र-१) व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने दि. १५/०२/२०२० ही तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, मप्रनि मंडळाने दि. १४/०१/२०२० रोजीच्या मराठी दैनिक "लोकसत्ता" व इंग्रजी दैनिक "द हितवाद" मध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी या कार्यालयाकडे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ.
६. जिल्हा परिषद, यवतमाळ.
७. जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ.
८. उप-विभागीय कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
९. तहसिल कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
१०. पंचायत समिती कार्यालय चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
११. ग्रामपंचायत कार्यालय वांढरी, ता. जि. चंद्रपूर.
१२. ग्रामपंचायत कार्यालय साखरवाही, ता. जि. चंद्रपूर.
१३. ग्रामपंचायत कार्यालय येरूर, ता. जि. चंद्रपूर
१४. ग्रामपंचायत कार्यालय तडाली, ता. जि. चंद्रपूर
१५. ग्रामपंचायत कार्यालय सोनेगांव, ता. जि. चंद्रपूर
१६. ग्रामपंचायत कार्यालय मुरसा, ता. जि. चंद्रपूर.
१७. ग्रामपंचायत कार्यालय नागाडा, ता. जि. चंद्रपूर.

वरील अनुक्रमांक ५ ते १७ वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्पामुळे बाधित अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

जनसुनावणीचे स्थळ प्रकल्प स्थळ, स. नं. ५०, ताडाली, ता. जि. चंद्रपूर निवडण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाच्या ठिकाणी असुन संबंधितांना सोईस्कर असल्याने या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली.

१) श्री. घनश्याम भुगांवकर, - **अध्यक्ष,**
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर

२) श्री मधुकर लाड, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

३) श्री. अजित पाटील, - **समन्वयक**
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

सदर प्रकल्पाबात प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप, निवेदन, प्रश्न व जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा आदेश अनुक्रमे सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. अजित पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहीती दिली. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक,सुचना,विचार,आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली. तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल असे सांगितले. तदनंतर पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ व ०१/१२/२००९ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार जनसुनावनीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी किंवा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी या दर्जाच्या असने बंधनकारक आहे. आजच्या जनसुनावणी साठी काही अपरिहार्य कारणास्तव अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर हे उपस्थित राहू शकले नाहीत असे सभेत सांगितले व जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे याबाबत संपर्क साधला असता जिल्हाधिकारी कार्यालयातून श्री. टी.डब्ल्यु. वाढई, नायब तहसिलदार, निवडणूक विभाग यांना आजच्या जनसुनावणीसाठी नेमण्यात आले. तद्नंतर समितीचे समन्वयक यांनी सभेस व मंचावर उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांना सांगितले की, पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार जनसुनावनीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी किंवा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी या दर्जाच्या असने बंधनकारक आहे, म्हणून आजची जनसुनावणी सुरू करायची किंवा कसे याबाबत विचारणा केली. मंचावरील उपस्थित अधिकाऱ्यांनी सांगितले की, जनसुनावणी सुरू करावयास हरकत नाही. तद्नंतर जनसुनावणी समन्वयक यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

जनसुनावणी समितीचे अध्यक्ष तथा नायब तहसिलदार, चंद्रपूर यांनी उपस्थित जनसमुदायास मे. विमला इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा. लि., कार्यालय-एफ-४, पहिला माळा, श्रद्धा हाऊस, किंग्स वे, एस.बी.आय. हेडक्वॉर्टर जवळ, नागपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित मे. विमला इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा. लि. स. नं. ५०, ताडाली, ता. जि. चंद्रपूर येथे ७.५ हे. क्षेत्रात १.५ दशलक्ष टन प्रति वर्ष उत्पादन क्षमतेच्या कोल वॉशरी प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार,आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना व आक्षेप या अधिसूचनेत नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविण्यात येतील, सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण व व्हिडीओ शुटींग म.प्र.नि.मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले.तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांनी प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचे शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने त्यांनी नेमलेल्या पर्यावरण सल्लागाराने सदर प्रस्तावित प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल मराठी भाषेत सादर केला.सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमिन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा,पाणी,जमिन,ध्वनी,विस्थापन इत्यादी बाबतची माहीती.
- नियोजीत प्रकल्पामुळे हवा, पाणी, विस्थापन, जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. भरत गुप्ता, ता. जि. चंद्रपूर:-**

| **अ. क्र.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. सदर प्रकल्प कार्यान्वित झाला तर त्याचे स्वागत आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पास जर समर्थन असेल तर उत्तमच आहे कारण त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल व या भागाचा विकास होईल. |

**२) श्री. नागदेव डाहूले, साखरवाही, ता. जि. चंद्रपूर:-**

| **अ. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. सदर प्रकल्प कार्यान्वित झाला तर त्याचे स्वागत आहे. सदर प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती होईल. या ठिकाणी अजून असे मोठे-मोठे प्रकल्प यावेत जेणेकरून या परिसरातील बेरोजगारी दूर होईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पास जर समर्थन असेल तर उत्तमच आहे कारण त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल व या भागाचा विकास होईल. |

**३) सौ. प्रतिभा ठाकूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| **अ. क्र.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. सदर प्रकल्प कार्यान्वित झाला तर त्याचे स्वागत आहे. या प्रकल्पास मी माझ्या शुभेच्छा देते. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पास जर समर्थन असेल तर उत्तमच आहे कारण त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल व या भागाचा विकास होईल. |

## ४) श्री. ईबादूल सिद्दीकी, सामाजिक कार्यकर्ता, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझा या प्रकल्पाला विरोध आहे. मी घुग्घूस परिसरात राहतो, घुग्घूस परिसरात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्रदूषण नियंत्रणेचे काम व्यवस्थित झालेले नाही. राष्ट्रीय स्तरावरचे अहवाल असे सांगतात की, चंद्रपूर परिसरात मोठ्या प्रमाणावर प्रदूषण आहे. माझा या प्रकल्पाला विरोध जनहितासाठी आहे. यात माझा वैयक्तिक काहीही स्वार्थ नाही. सदर नियोजित कोल वॉशरीच्या सांडपाण्याची विल्हेवाट कशी लावणार, सदर सांडपाणी नाल्यावाटे नदीत जाणार काय, सदर सांडपाणी शेतकऱ्यांच्या शेतात जाणार काय, सदर कोल वॉशरीमुळे कोळशाचे कण उडून हवा प्रदूषण होऊन परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे नूकसान होईल असे सांगतिले. सदर प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या देखील वाढतील. कोळशाची वाहतूक करताना बऱ्याच प्रमाणात धुलीकण व कोळशाचे कण उडून हवा प्रदूषण होते व नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होतो. प्रकल्प धारकाने सादरीकरणादरम्यान असे सांगितले आहे की, फक्त ४५ व्यक्तिंना सदर प्रकल्पात रोजगार मिळेल. परिणामी या परिसरातील बेरोजगारांचा प्रश्न सुटणार नाही व या परिसराचा विकास सदर प्रकल्पामुळे होणार नाही. अगोदरच चंद्रपूर परिसरातील कारखान्यांचे प्रदूषण झालेले आहे व त्यात हा प्रकल्प जर आला तर प्रदूषणाच्या पातळीत आणखी वाढ होईल म्हणून या प्रकल्पाला सामाजिक कार्यकर्ता म्हणून विरोध आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरणाबाबत काळजी घेण्यात येणार आहे. धुलाई विभागामध्ये वेगवेगळ्या केलेल्या कोळशावर प्रक्रिया करून त्याची गुणवत्ता सुधारली जाते. सदर प्रकल्पातून घरगुती किंवा औद्योगिक सांडपाणी प्रकल्पाच्या बाहेर जाणार नाही याची दक्षता घेतली जाईल. सांडपाण्याची थिकनर मध्ये प्रक्रिया करून सांडपाण्याचा उपयोग पुन्हा कोल वॉशींगकरिता, धूळ दमनकरिता (Dust suppression), वृक्ष संवर्धन व बागकामाकरिता करण्यात येईल. तसेच प्रसाधन गृह स्वच्छ करण्याकरिता वापरण्यात येईल. १०० टक्के सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया व पुनर्वापर करण्यात येईल. हवा प्रदूषणाकरिता पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतील. ट्रकच्या माध्यमातून कमीतकमी वाहतूक करणे व वाहतुकीकरिता रेल्वे सायडींगचा अधिकाधिक वापर करण्यात येईल. कोळसा वाहून नेण्यात येणारे ट्रक हे ताडपत्रीने आच्छादित करण्यात येतील. धूळ निर्मिती टाळण्याकरिता आंतरिक रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्यात येईल. अनलोडींगदरम्यान रेल्वे वॅगन रूंदी पर्यंत सतत पाण्याची फवारणी करण्यात येईल. सर्व स्थलांतरण केंद्रावर धूळ निर्गमन /जल फवारणी व्यवस्था पूरविण्यात येईल. कोळसा क्रशरवर बॅग फिल्टर बसविण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | येईल. तसेच ध्वनी प्रदूषणाकरिता आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील. |

५) **श्री. मनोज आमटे, सरपंच येरूर, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पाला माझा विरोध आहे. विमला कंपनीची रेल्वे सायडींग सुरू होऊन १० वर्षे झाली आहेत. परंतु त्यामुळे पर्यावरणाचे नूकसानच झालेले आहे. मागील १० वर्षात विमला कंपनीने येरूर गावासाठी किती CSR निधी उपलब्ध करून दिला ते सांगावे. विमला कंपनीने CSR निधीतून येरूर गावासाठी एकसुद्धा काम केलेले नाही. प्रकल्पधारकाचे सादरीकरण करणाऱ्यांना श्री. मनोज आमटे यांनी असा प्रश्न विचारला की, पूर्वी जेव्हा ग्रेस इंडस्ट्रीज लि. ताडाली या उद्योगाची जेव्हा जनसुनावणी झाली होती त्यावेळेस तुम्ही असेच थातुरमातूर सादरीकरण करून नागरीकांची दिशाभूल केली व पर्यावरणासाठी आवश्यक त्या उपायोजना केल्या नाहीत परिणामी प्रदूषण वाढले आहे, शेतीचे नूकसान झाले आहे, हवे तर कृषी खात्याच्या अधिकाऱ्यांमार्फत शेत नूकसानीचे सर्वेक्षण करून घ्या. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, दि. ०१/०५/२०१८ च्या अधिसूचनेनूसार उद्योजक पर्यावरणीय उत्तरदायित्व (CER) राबविण्यात येईल जेणेकरून सामाजिक उत्तरदायित्व निभावण्यात येईल. एकूण प्रकल्पाच्या २ टक्के रक्कम म्हणजेच रू. ४४.२५ लाखांची तरतूद करण्यात आलेली आहे. परिसरातील काही निवडक गावांना आदर्श गांव म्हणून विकसित करण्याची प्रस्ताव आहे. सामाजिक क्षेत्र सर्वेक्षणादरम्यान आढळलेल्या आवश्यकता मुल्यांकनाच्या आधारे उद्योजक पर्यावरणीय उत्तरदायित्व (CER) ठरविण्यात येईल. उपक्रम ठरविल्यानंतर जिल्हा प्राधिकऱ्यांशी समन्वय साधून CER उपक्रम राबविण्यास प्रारंभ करतील. प्रकल्पामुळे रोजगाराच्या संधी वाढतील. आजची जनसुनावणी ही विमला कोल वॉशरीशी निगडीत आहे, मे. ग्रेस इंडस्ट्रीज लि. सोबत निगडीत नाही. मे. ग्रेस इंडस्ट्रीज लि. मुळे होणाऱ्या प्रदूषणाची तपासणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केली जाईल. तसेच कृषी खात्याकडून देखील शेतीच्या नूकसानीबाबत अहवाल मागविला जाईल. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात येईल व तद्नंतर शेत नूकसानीबाबत उचित निर्णय घेतला जाईल. |

**६) श्री. जगदीश शामराव जोगी, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पाला माझा विरोध आहे. शासनाने पर्यावरणासाठी आवश्यक त्या उपायोजना केल्या नाहीत परिणामी प्रदूषण वाढले आहे, शेतीचे नूकसान झाले आहे, हवे तर कृषी खात्याच्या अधिकाऱ्यांमार्फत शेत नूकसानीचे सर्वेक्षण करून घ्या. माझ्या स्वत:च्या शेतीतील पांढऱ्या कापसावर प्रदूषणामुळे काळ्या रंगाचे धुलीकण पडलेले आहेत परिणामी माझ्या कापसाची गुणवत्ता खराब झालेली आहे. सध्याचा जिनींग मिलमध्ये पाठविलेला माझा १३ क्विंटल कापूस परत आलेला आहे. माझ्या काळपट पडलेल्या कापसाला रू. ५५००/- ऐवजी रू. २०००/- प्रति क्विंटल असा दर देण्यात आलेला आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरणाबाबत काळजी घेण्यात येणार आहे. १०० टक्के सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया व पुनर्वापर करण्यात येईल. हवा प्रदूषणाकरिता योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. मे. ग्रेस इंडस्ट्रीज लि. व ताडाली परिसरातील नजीकच्या उद्योगांमुळे होणाऱ्या प्रदूषणाची तपासणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केली जाईल. तसेच कृषी खात्याकडून देखील शेतीच्या नूकसानीबाबत अहवाल मागविला जाईल. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल व तद्नंतर शेत नूकसानीबाबत उचित निर्णय घेतला जाईल. |

**७) श्री. राजेश्वर वैद्य, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पाला माझा विरोध आहे. सद्य:स्थितीत प्रदूषण खुपच वाढत आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरणाबाबत काळजी घेण्यात येणार आहे. १०० टक्के सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया व पुनर्वापर करण्यात येईल. हवा प्रदूषणाकरिता योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. तसेच ध्वनी प्रदूषणाकरिता आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील. |

८) **श्री. सुरज गावंडे, भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. सदर प्रकल्प कार्यान्वित झाला तर त्याचे स्वागत आहे. श्री. मनोज आमटे व इतर येरूरच्या नागरीकांनी जो ग्रेस इंडस्ट्रीज लि. च्या प्रदूषणाचा मुद्दा येथे उपस्थित केलेला आहे तो योग्य नाही. आजची जनसुनावणी मे. विमला इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. च्या प्रस्तावित कोल वॉशरीबाबत आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पास जर समर्थन असेल तर उत्तमच आहे कारण त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल व या भागाचा विकास होईल. |

९) **श्री. नामदेव डाहुले, साखरवाही, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. सदर प्रकल्प कार्यान्वित झाला तर त्याचे स्वागत आहे. आज जनसुनावणीमध्ये येरूर गावाचे नागरीक प्रदूषणाबाबत बोलत आहेत. परंतु मी त्यांना सांगू ईच्छितो की, ज्यावेळेस ताडाली येथे एमआयडीसी ने जागा घेतली त्यावेळेस विरोध का नाही केला. या परिसरात एमआयडीसी झाली आहे म्हणून वेगवेगळे कारखाने आलेले आहेत. म्हणून रोजगार वाढलेला आहे व या भागाचा विकास होत आहे. आपण जर अशी अडवणूक केली तर चंद्रपूर मध्ये कोणीही गुंतवणूकदार (Investor) यायला तयार होणार नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पास जर समर्थन असेल तर उत्तमच आहे कारण त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल व या भागाचा विकास होईल. |

१०) **डॉ. शरद रणदिवे, सरपंच, नागाळा, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे, तथापी आमच्या नागाळा गावातील लोकांना या प्रकल्पात रोजगार द्यावा अशी माझी मागणी आहे. प्रकल्पाच्या १० किमी च्या परिघामध्ये नागाळा गांव येते म्हणून नागाळा गावाच्या लोकांना रोजगार द्यावा. सादरीकरणात असा उल्लेख आहे की, फक्त ४५ लोकांनाच रोजगार मिळेल हे खरे आहे काय? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, नागाळा गावाच्या लोकांनादेखील रोजगार दिला जाईल. प्रकल्पास जर समर्थन असेल तर उत्तमच आहे कारण त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल व या भागाचा विकास होईल. |

### ११) श्री. मिलींद शेंडे, भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. निप्पॉन, एम्टा सारख्या कंपन्या बंद झाल्यामुळे या परिसरात बेरोजगारी वाढली आहे. म्हणून विमला कोल वॉशरी चालु व्हावी परंतु त्यांनी प्रदूषणावर नियंत्रण केले पाहिजे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पास जर समर्थन असेल तर उत्तमच आहे कारण त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल व या भागाचा विकास होईल. |

### १२) श्री. नितेश बांदूरकर, सोनेगांव, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मी एक वाहनचालक आहे. कोल वॉशरी कधी चालु करणार हे सांगावे. विमला कंपनीने आधी रस्त्याच्या आजु-बाजूला १० फुटाची ऊंची होईपर्यंत झाडे जगवावेत व नंतरच कोल वॉशरी सुरू करावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, योग्य ऊंचीची झाडे लावण्यात येतील. तसेच १० फुटांची ऊंची होईपर्यंत त्यांची निगा राखली जाईल. तसेच पर्यावरणाबाबत काळजी घेण्यात येणार आहे. १०० टक्के सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया व पुनर्वापर करण्यात येईल. हवा प्रदूषणाकरिता योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. तसेच ध्वनी प्रदूषणाकरिता आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील. |

### १३) श्री. मधुकर लाड, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर तथा जनसुनावणी समिती सदस्य:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | विमला कोल वॉशरीने Avenue Plantation करावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, Avenue Plantation करण्यात येईल. |

### १४) श्री. सुरेश घरोडे, ग्रामपंचायत सदस्य येरूर, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझा विरोध आहे. महाराष्ट्र प्रदूषण | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, |

| | | |
|---|---|---|
| | नियंत्रण मंडळाने ताडाली परिसरातील काही उद्योगांना दंड ठोठावलेला आहे. परंतु हा पैसा शासनाकडे जमा होईल त्याचा आम्हा शेतकऱ्यांना काय फायदा. आजच आम्हाला लेखी द्या की, आम्हा शेतकऱ्यांना नूकसान भरपाई देण्यात येईल. | पर्यावरणाबाबत काळजी घेण्यात येणार आहे. १०० टक्के सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया व पुनर्वापर करण्यात येईल. हवा प्रदूषणाकरिता योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. तसेच ध्वनी प्रदूषणाकरिता आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील.<br>जनसुनावणी समितीमार्फत सांगितले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरणीय नूकसान भरपाई साठी या परिसरातील उद्योगांना दंड ठोठावण्याच्या नोटीसा बजाविल्या आहेत. मे. ग्रेस इंडस्ट्रीज लि. व ताडाली परिसरातील नजीकच्या उद्योगांमुळे होणाऱ्या प्रदूषणाची तपासणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केली जाईल. तसेच कृषी खात्याकडून देखील शेतीच्या नूकसानीबाबत अहवाल मागविला जाईल. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल व तद्नंतर शेत नूकसानीबाबत उचित निर्णय घेतला जाईल. |

१५) **श्री. रमाकांत बल्की, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझा विरोध आहे. आम्हा शेतकऱ्यांना नूकसान भरपाई देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी व समितीमार्फत असे सांगितले की, कृषी खात्याकडून शेतीच्या नूकसानीबाबत अहवाल मागविला जाईल. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल व तद्नंतर शेत नूकसानीबाबत उचित निर्णय घेतला जाईल. |

**१६) श्री. रूपेश क्षीरसागर, साखरवाही, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. सदर प्रकल्प कार्यान्वित झाला तर त्याचे स्वागत आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पास जर समर्थन असेल तर उत्तमच आहे कारण त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल व या भागाचा विकास होईल. |

**१७) श्री. दिपक दिक्षीत, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझा विरोध आहे. विमला कोल वॉशरी प्रकलपधारकाच्या सल्लागाराने केलेला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा चुकीचा आहे. या परिसरातील नागरीकांचा या प्रकल्पास असेच आज जनसुनावणी दरम्यान दिसून येत आहे. शासन जेव्हा पर्यावरण मंजूरी देते तेव्हा त्यात बऱ्याचशा अटी व शर्ती असतात. परंतु त्याचे पालन प्रकल्पधारक व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ करत नाही. आज जनसुनावणी दरत्यान एका शेतकऱ्याने त्याचा काळपट झालेला कापूस दाखविला. यावरून हे सिद्ध होते की, या परिसरात आधीच प्रदूषण आहे व सदर प्रकल्प कार्यान्वित झाल्यास प्रदूषणाच्या पातळीत नक्कीच वाढ होईल. हवा प्रदूषणाच्या बाबतीत चंद्रपूरचा CEPI मानांकनामध्ये ४था क्रमांक लागतो. तसेच राष्ट्रीय हरीत लवादाच्या दि. १४/११/२०१८ च्या आदेशान्वये नूकसान भरपाई देणे आवश्यक ठरते व राष्ट्रीय हरीत लवादाच्या आदेशाप्रमाणे CEPI क्षेत्रात १० कि.मी. पर्यंत नविन उद्योगास बंदी आहे. विमला कोल वॉशरीच्या प्रकल्पाचे स्थळ ताडाली एमआयडीसीपासून १० कि.मी. पेक्षा कमी आहे. तथापी, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये सदर अंतर १५कि.मी. दाखविले असल्याने माझे असे म्हणणे आहे की, सदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल दिशाभूल करणारा आहे व चुकीचा आहे. म्हणून या प्रकल्पास पर्यावरण मंजूरी देण्यात येऊ नये अशी माझी मागणी आहे. तसेच आज सर्व शासनाचे | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा अधिसूचनेनूसार बनविण्यात आला आहे व त्यात सर्व तांत्रिक व इतर मुद्यांचा योग्यरीतीने समावेश केलेला आहे. शासन जेव्हा या प्रकल्पाला पर्यावरण मंजूरी देईल तेव्हा त्यात बऱ्याचशा अटी व शर्ती असतील व त्यांचे पलन करणे प्रकल्पधारकांना बंधनकारक असेल व त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल. श्री. दिपक दिक्षीत यांनी आज जनसुनावणी दरत्यान एका शेतकऱ्याने त्याचा काळपट झालेल्या कापसाबद्दल उल्लेख केला. त्यावर समितीमार्फत पुढीलप्रमाणे सांगण्यात आले - ताडाली परिसरातील नजीकच्या उद्योगांमुळे होणाऱ्या प्रदूषणाची तपासणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केली जाईल. तसेच कृषी खात्याकडून देखील शेतीच्या नूकसानीबाबत अहवाल मागविला जाईल. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल व |

| | | |
|---|---|---|
| | अधिकारी वर्ग येणार आहेत म्हणून विमला इन्फ्रास्ट्रक्चर्स उद्योगाने रस्त्यावर पाणी शिंपडले आहे. | तद्नंतर शेत नूकसानीबाबत उचित निर्णय घेतला जाईल. तसेच उद्योजक पर्यावरणीय उत्तरदायित्व (CER) राबविण्यात येईल जेणेकरून सामाजिक उत्तरदायित्व निभावण्यात येईल. एकूण प्रकल्पाच्या २ टक्के रक्कम म्हणजेच रू. ४४.२५ लाखांची तरतूद करण्यात आलेली आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरणाबाबत काळजी घेण्यात येणार आहे. सदर प्रकल्पातून घरगुती किंवा औद्योगिक सांडपाणी प्रकल्पाच्या बाहेर जाणार नाही याची दक्षता घेतली जाईल. सांडपाण्याची थिकनर मध्ये प्रक्रिया करून सांडपाण्याचा उपयोग पुन्हा कोल वॉशींगकरिता, धूळ दमनकरिता (Dust suppression), वृक्ष संवर्धन व बागकामाकरिता करण्यात येईल. १०० टक्के सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया व पुनर्वापर करण्यात येईल. हवा प्रदूषणाकरिता आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील. |

**१८) श्री. मनिष दास, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. मी एक युवक आहे. युवक या नात्याने सांगतो की, असे प्रकल्प आल्यास परिसरातील बेरोजगारी दूर होईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पास जर समर्थन असेल तर उत्तमच आहे कारण त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल व या भागाचा विकास होईल. |

१९) **श्री. प्रेम जोगी, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझा विरोध आहे. माझ्या शेतात विमला कंपनीच्या कोळशाच्या ट्रकच्या वाहतूकीमुळे कोळशाचे कण व इतर धुलीकण माझ्या शेतातील पिकांवर येतात. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, हवा प्रदूषणाकरिता पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतील. ट्रकच्या माध्यमातून कमीतकमी वाहतूक करणे व वाहतुकीकरिता रेल्वे सायडींगचा अधिकाधिक वापर करण्यात येईल. कोळसा वाहून नेण्यात येणारे ट्रक हे ताडपत्रीने आच्छदित करण्यात येतील. धूळ निर्मिती टाळण्याकरिता आंतरिक रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्यात येईल. अनलोडींगदरम्यान रेल्वे वॅगन रूंदी पर्यंत सतत पाण्याची फवारणी करण्यात येईल. सर्व स्थलांतरण केंद्रावर धूळ निर्गमन /जल फवारणी व्यवस्था पूरविण्यात येईल. कोळसा क्रशरवर बॅग फिल्टर बसविण्यात येईल. |

२०) **श्री. मंगेश तानकर, साखरवाही, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पास जर समर्थन असेल तर उत्तमच आहे कारण त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल व या भागाचा विकास होईल. |

२१) **श्री. नीरज बोंडे, साखरवाही, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पास जर समर्थन असेल तर उत्तमच आहे कारण त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल व या भागाचा विकास होईल. |

२२) **श्री. दिनेश चोखारे, ताडाली, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | विमला इन्फ्रास्ट्रक्चर्समुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत म.प्र.नि. मंडळाकडे किती तक्रारी आल्या आहेत अशी विचारणा केली. माझा या प्रकल्पाला विरोध नाही. परंतु प्रदूषण विषयक काळजी घ्या व स्थानिकांना रोजगार द्या. माझे स्वत:चे २५ एकर शेत आहे. माझ्या शेतात पण धुलीकण येतात. ताडाली परिसरातील उद्योगांबाबत येथील स्थानिकांनी म.प्र.नि. मंडळाकडे बऱ्याच तक्रारी केलेल्या आहेत. त्याबाबत म.प्र.नि. मंडळाने काही कार्यवाही केलेली आहे काय. परिसरातील शेतकऱ्यांच्या तक्रारींची चौकशी करा व त्यांना नूकसान भरपाई द्या अशी माझी मागणी आहे. विमला कोल वॉशरी प्रकल्पास माझे समर्थन आहे, तथापी त्यांनी प्रदूषण करू नये या अटीवर. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरणाबाबत काळजी घेण्यात येणार आहे. १०० टक्के सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया व पुनर्वापर करण्यात येईल. हवा प्रदूषणाकरिता योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. तसेच ध्वनी प्रदूषणाकरिता आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील.<br>मे. ग्रेस इंडस्ट्रीज लि. व ताडाली परिसरातील नजीकच्या उद्योगांमुळे होणाऱ्या प्रदूषणाची तपासणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केली जाईल. तसेच कृषी खात्याकडून देखील शेतीच्या नूकसानीबाबत अहवाल मागविला जाईल. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल व तद्नंतर शेत नूकसानीबाबत उचित निर्णय घेतला जाईल. श्री. दिनेश चोखारे यांनी पुढीलप्रमाणे त्यांचे म्हणणे मांडले- विमला कोल वॉशरी प्रकल्पास माझे समर्थन आहे, तथापी त्यांनी प्रदूषण करू नये या अटीवर. |

२३) **श्री. दिपक दिक्षीत, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझ्या असे लक्षात येत आहे की, आजच्या जनसुनावणीचे ईतिवृत्त लिहीले जात नाही आहे. ही फक्त चर्चाच सुरू आहे. | जनसुनावणी समन्वयक यांनी सांगितले की, जनसुनावणीचे ईतिवृत्त स्वत: हस्ताक्षरात लिहीत आहे व श्री. दिपक दिक्षीत यांना डायरीमध्ये लिहीलेले कच्चेईतिवृत्त दाखविण्यात आले. तसेच त्यांना सांगितले की, सदर जनसुनावणीचे छायाचित्रीकरण देखील करण्यात येत आहे. |

२४) **श्री. नीरज बोंडे, साखरवाही, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. प्रकल्पधारकानं सामाजिक दायित्व निभावले पाहिजे. परिसरातील शेतकऱ्यांच्या जमीनी अधिग्रहीत करण्यात आल्या एमआयडीसी तयार झाली त्यावेळेस स्थानिकांनी विरोध का नाही केला? ताडाली परिसरातील उद्योगांबाबत येथील स्थानिकांनी म.प्र.नि. मंडळाकडे बऱ्याच तक्रारी केलेल्या आहेत. त्याबाबत म.प्र.नि. मंडळाने काही कार्यवाही केलेली आहे काय. परिसरातील शेतकऱ्यांच्या तक्रारींची चौकशी करा व त्यांना नूकसान भरपाई द्या अशी माझी मागणी आहे. मी देखील एक शेतकरी आहे. आपण लढले पाहिजे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पास जर समर्थन असेल तर उत्तमच आहे कारण त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल व या भागाचा विकास होईल. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. त्यानंतर सदस्य पर्यावरण जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत करण्यात आलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग जनतेकरिता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, पहिला माळा, उद्योग भवन, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर येथे थोड्या दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **(अजित पाटील)**<br>समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | **(मधुकर लाड)**<br>सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | **(टी.डब्ल्यु.वाढई)**<br>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा नायब तहसिलदार निवडणूक विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर |